## कोराडी येथे आरोग्यनिदान शिबीर संपन्न

दिनांक १३.०६.२००९ला कोराडी वीज मंडळाच्या दवाखान्यात महिलांकरिता H.b %आणि Blood Sugar तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार वंजारी कोराडी दवाखाना यांच्या समन्वयाने आणि डॉ. श्रीमती लीरानी हायटेक हॉस्पिटल नागपूर यांच्या सौजन्याने या शिबीराचे आयोजन करण्यात आले.

कोराडी औष्णिक वीज केंद्रातील अधिकारी कर्मचारी व त्यांच्या परिवाराचे आरोग्य सदृढ राहावे, जेणे करुन कर्मचारी / अधिकारी त्यांचे कार्य अधिक व उत्तम प्रकारे करु शकतील, हा उद्देश ठेवून डॉ. विजयकुमार वंजारी यांनी सदैव प्रयत्न करुन आतापर्यंत विविध आजाराच्या तपासणी करिता ४९ शिबीराचे आयोजन त्यांनी केले.

महिलांकरिता आयोजित शिबीरामध्ये एकुण ६६ महिलांचे H.b व Blood Sugar करण्यात आले. त्यामध्ये २३ महिलांच्या शरीरातील रक्ताचे प्रमाण कमी असल्याचे आढळुन आले. तर ५ महिलांचे Blood Sugar अधिक प्रमाणात असल्याचे आढळुन आले. या सर्व रुग्णांना डॉ. वंजारी आणि हायटेक हॉस्पिटलच्या डॉ. श्रीमती लिरानी यांनी नियमित औषध उपचार करुन वेळोवेळी तपासणी करुन घेण्यासबंधी सल्ला दिला. या शिबीरात हायटेक हॉस्पिटलच्या चमू आणि कोराडी हॉस्पिटल चमू मोलाचे सहकार्य केले.

## महाजेनको कंपनीच्या ४ थ्या वर्धापनादिनानिमित्त आयोजित "रक्तदान शिबिर"

दिनांक ०६.०६.२००९ रोजी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या ४ थ्या वर्धापन दिनानिमित्त नाशिक औष्णिक विद्युत केंद्राने "रक्तदार शिबिर" आयोजित केले होते. त्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. शालीक खराबे -तत्कालीन मुख्य महाव्यवस्थापक, नाशिक औ. वि. केंद्र हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. पी. एम. चौधरी व श्री. जी. एम. पचारे - महाव्यवस्थापक, श्री. मधुकर बापट - अध्यक्ष, जनकल्याण रक्तपेढी, श्री. ल. गो. जोशी - संचालक, जनकल्याण रक्तपेढी, तसेच डॉ. यु. एस. तांबोळी, श्री. विलास मांडे, श्री. आर. डी. पाठक, श्री. सी. व्ही. पेटकर - अधीक्षक अभियंता, श्री. अरविंद वानखेडे - प्रशासकीय अधिकारी, श्री. बी. ए. सुर्यवंशी - उप अभियंता, श्री. सुर्यकांत पवार - सहा. अभि. आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री.मधुकर बापट म्हणाले की, आज रक्ताची मागणी मोठ्या प्रमाणात असून रक्तदात्याशिवाय पर्याय नाही. रक्तसंकलनानंतर रक्ताच्या विविध टेस्ट केल्या जातात. त्याला मोठ्या प्रमाणात खर्च येतो. हे सर्व करतांना रक्त पेढीचे कार्य समजावून घ्यावे व सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. याप्रसंगी ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्या सर्वाना गौरवपत्र देऊन सन्मानित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नरेंद्र कलंकार यांनी केले तर आभार सौ.जयश्री गोरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ.पिसोळकर, गवळी, महेश पाटील, जनकल्याण रक्तपेढीचे स्टाफ तसेच सौ. जयश्री गोरे, सर्वश्री राजन शिंदे, नरेंद्र कलंकार, डी. जी. शिंदे लोखंडे आदींनी परिश्रम घेतले.

## नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, एकलहरे व्दारा एल ॲड टी कंपनीतील अभियंत्यासाठी प्रशिक्षण शिबिर

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादीत च्या अंतर्गत नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्रा मध्ये एल ॲड टी कंपनीतील अभियंत्यासाठी, Power plant Familarization हया विषयावर (दिनांक ०१.०६.२००९ ते ०४.०६.२००९ पर्यत पहिले सत्र तसेच दिनांक २९.०६.२००९ ते ०२.०७.२००९ दुसरे सत्र) प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. हया प्रशिक्षण शिबिरात वेगवेगळया विषयात पदवीधर / उच्च पदवीधर असलेल्या एकुण २३ अभियंत्यानी भाग घेतला. त्यांना थर्मल पॉवर स्टेशनची इतभुत माहिती देण्याकरिता एल.ॲड.टी कंपनीने नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्रास विनंती केली होती. त्यानुसार त्याच्या गरजे व अपेक्षे प्रमाणे ४ दिवसाचा ट्रेनिंग कोर्सची रुपरेषा आखुन थर्मल पॉवर स्टेशन मध्ये वापरण्यात येणाऱ्या विविध उपकरणांची, प्रामुख्याने बॉयलर, टर्बाईन, जनरेटर व इतर संबंधित उपकरणाची माहिती पुरविण्यात आली.

श्री. एस.बी. भांदेकर, अधीक्षक अभियंता, नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र, तसेच श्री. एम.टी. राणे तांत्रिक सल्लागार, श्री आशिष वाडेकर व मिस. खुशबु, एल अॅड टी हाजिरा (गुजरात राज्य) हयांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलन करुन हया प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले.

श्री. एस. बी . भांदेकर अधीक्षक अभियंता (निर्मिती प्रशिक्षण) नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र यांनी गुणवत्तायुक्त प्रशिक्षणा वर आमचा विश्वास आहे. असे सांगुन महाजेनको संबंधी माहिती दिली. तसेच अशा शिबिरामध्ये सहभागी होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

दिनांक २ जुलै २००९ ला या सर्व अभियंत्यांना निरोप देण्यात आला या निरोप समारंभास श्री. एम. टी. राणे तांत्रिक सल्लागार श्री आशिष वाडेकर व मिस. खुशबु, एल अॅड टी हाजिरा (गुजरात राज्य) इत्यादी उपस्थित होते.

प्रशिक्षण काळात या अभियंत्याना सर्व सोयी पुरविण्यात आल्या होत्या.निरोप समारंभप्रसंगी त्यांनी सुंदर अभिप्राय प्रकट केला.

या प्रशिक्षणाकरिता श्री. जे.एम. इब्राहिम कार्यकारी अभियंता व श्री. एस. आर. शिंदे उप कार्यकारी अभियंता यांनी समन्वयक म्हणुन काम बघितले.